# महाराष्ट्रातील ठळक बांबूच्या प्रजाति

1. **शास्त्रीय नाव: Dendrocalamus strictus**

**स्थानिक नाव:** लाठी बांबू (**मराठी नाव**- मानवेल; **हिंदी नाव**- बांस खुर्द)

**ऊंची:** ८-१६ मीटर

**व्यास:** २.५-८ सें.मी.

**पेरामधील अंतर:** ३०-४५ सें.मी.

**पेराची जाडी:** ०.५-२ सें.मी.

**फुलोरा चक्र:** २५-४५ वर्षं

**पुनरुत्पादन:** बियापासून; शाकीय पद्धतिने; उती संवर्धनाने

**लागवडी योग्य अंतर:** ४ बाय ६ मीटर

**आढळस्थान:** महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओरीसा

**उपयोग:** वरील प्रजाती मध्यम प्रकार ची असून ती कमी पाण्याच्या क्षेत्रात सुद्धा सहज रित्या आढळून येते. याला लाठी बांस म्हणून प्रामुख्याने ओळखतात आणि असल्या कारणाने पोलिस विभागात मोठ्या प्रमाणात या बांबू चा वापर दंड्यासाठी होतो. इतर ठिकाणी सुद्धा जसे कि शेतकाम, फर्निचर, बास्केटरी आणि बांधकामात या बांबू चा उपयोग होतो. थोडक्यात 'मूर्ति लहान पण किर्ति महान' अशा प्रकार ची ही प्रजाती असून जवळपास सर्वच ठिकाणी या बांबू चा उपयोग आढळून येतो.

2. **शास्त्रीय नाव: Bambusa balcooa**

**स्थानिक नाव:** भीमा बांबू

**ऊंची:** १६-२३ मीटर

**व्यास:** ८-१५ सें.मी.

**पेरामधील अंतर:** २०-४५ सें.मी.

**पेराची जाडी:** १.९-२.५ सें.मी.

**फुलोरा चक्र:** ३०-४५ वर्षं

**पुनरुत्पादन:** शाकीय पद्धतीने; उती संवर्धनाने

**लागवडी योग्य अंतर:** ५ बाय ६ मीटर

**आढळस्थान:** उत्तर पूर्व भारत, नागालॅंड, बिहार,उत्तर प्रदेश, पूर्वोत्तर भाग

**उपयोग:** बाल्कोआ हा मोठ्या प्रकारचा बांबू असून अतिशय मजबूत असल्या कारणाने प्रामुख्याने इमारत बांधकामात वापरला जातो. स्कफोल्डिंग आणि शिड्या बनवण्यासाठी सुद्धा याचा विशेषतः वापर केल्या जातो. इतरत्र सुद्धा जसे की पेपर कारखाने, हस्तकला, अगरबत्ती, आणि घरातील शोभेच्या वस्तु बनविण्यासाठी या बांबू चा उपयोग होतो.

3. **शास्त्रीय नाव: Bambusa nutans**

**स्थानिक नाव:** माला बांबू

**ऊंची:** १५-२० मीटर

**व्यास:** ५-१० सें.मी.

**पेरामधील अंतर:** २५-४५ सें.मी.

**पेराची जाडी:** १-१.५ सें.मी.

**फुलोरा चक्र:** ३५ वर्षं

**पुनरुत्पादन:** बियापसून; शाकीय पद्धतीने; उती संवर्धनाने

**लागवडी योग्य अंतर:** ५ बाय ६ मीटर

**आढळस्थान:** ओरीसा, पश्चिम बंगाल, उत्तर पूर्व भारत

**उपयोग:** या बांबू ची रांझी फार गुंतागुंतीची नसून smooth असते. हा बांबू सरळ वाढत असल्या कारणाने बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात वापरण्यात येतो. इतरत्र सुद्धा जसे की पेपर कारखाने, landscaping, शेतीचे अवजार, खांब, हस्तकला, बास्केटरी, आणि घरातील शोभेच्या वस्तु बनवण्यासाठी हा बांबू उपयोगी आहे.

4. **शास्त्रीय नाव: Bambusa polymorpha**

**स्थानिक नाव:** नारंगी बांबू

**ऊंची:** १६-२५ मीटर

**व्यास:** ८-१५ सें.मी.

**पेरामधील अंतर:** ४०-६० सें.मी.(८-१५ सें.मी.)

**पेराची जाडी:** २-२.५ सें.मी.

**फुलोरा चक्र:** ५५-६० वर्षं

**पुनरुत्पादन:** बियापासून; शाकीय पद्धतीने

**लागवडी योग्य अंतर:** 5 बाय 5 मीटर

**आढळस्थान:** भारत, बांगलादेश, म्यानमार

**उपयोग:** या बांबू चे अभियांत्रिकी गुण, टिकाऊपण आणि लांबी लक्षात घेता याला बांधकाम क्षेत्रात बरीच पसंती आहे. याचे कंद खाण्यायोग्य असून कच्चे असताना सुद्धा गोड आणि स्वादिस्ट असतात. इतर ठिकाणी जसे की अगरबत्ती, लगदा, आणि landscaping साठी हा बांबू उपयोगी आहे.

5. **शास्त्रीय नाव: Bambusa tulda**

**स्थानिक नाव:** देव बांबू, पेका

**ऊंची:** १५-२० मीटर

**व्यास:** ५-१० सें.मी.

**पेरामधील अंतर:** ४०-७० सें.मी.

**पेराची जाडी:** ०.८-१.५ सें.मी.

**फुलोरा चक्र:** ३०-६० वर्षं

**पुनरुत्पादन:** बियापसून, शासकीय पद्धतीने व उती संवर्धनाने

**लागवडी योग्य अंतर:** ५ बाय ६ मीटर

**आढळस्थान:** उत्तर पूर्व भारत, आसाम, बिहार, मिजोरम,अरुणाचल प्रदेश, उत्तर प्रदेश

**उपयोग:** इतर बांबू चा तुलनेत तुलडा बांबू मधील खड्यांचे अंतर जास्त असल्यामुळे याचा उपयोग मुख्यत्वे अगरबत्ती कारखान्यांमद्धे मोठ्या प्रमाणात होतो. या प्रजातिच्या पानांमध्ये औषधी गुण सुद्धा बघायला आढळतो. वरील बांबू पासण एक विशेष प्रकार ची बासुरी सुद्धा बनविल्या जाते ज्याचा पूजे मध्ये वापर होतो. अरुणाचल प्रदेश क्षेत्रात अशी मान्यता आहे की या बासुरी चा आवाजातिल सुराणे सर्व आसुरी शक्तींचा विनाश होतो. इतरत्र सुद्धा जसे की बांबू च्या पट्ट्या काढून चटई, टोपल्या, हस्तकला, बांधकाम, लगदा, धाण्याच्या कोठया इत्यादि वस्तु बनवण्यात या बांबू चा उपयोग बघायला मिळतो.

6. **शास्त्रीय नाव: Bambusa vulgaris**

**स्थानिक नाव:** सुंदर बांबू

**ऊंची:** ८-२० मीटर

**व्यास:** ५-१० सें.मी.

**पेरामधील अंतर:** ३०-४५ सें.मी.

**पेराची जाडी:** ०.७-१.५ सें.मी.

**फुलोरा चक्र:** ८० वर्षं

**पुनरुत्पादन:** शाकीय पद्धतीने; उती संवर्धनाने

**लागवडी योग्य अंतर:** ५ बाय ५ मीटर

**आढळस्थान:** संपूर्ण भारतात

**उपयोग:** हा बांबू पुर्णपणे हिरवा असल्या कारणाने बाग बगीचे आणि उद्यानाची शोभा वाढवितांना आढळून येतो. या बांबू चा उपयोग मुख्यत्वे हस्तकला मध्ये शोभे चा वस्तु बनवण्यात केला जातो. टोपी बनवण्याकरिता विशेषतः या बांबू चा उपयोग केला जातो. वरील बांबू मध्ये भरीवपणा जास्त असल्यामुळे वजन जास्त भरते, त्यामुळे कागद बनविण्याकरिता सुद्धा हा बांबू अत्यंत उपयोगी आहे. तसेच या बांबू च्या पानांचा उपयोग औषधी म्हणून देखील केला जातो.

7. **शास्त्रीय नाव: Dendrocalamus brandisii**

**स्थानिक नाव:** ब्रंडिसी

**ऊंची:** १९-३३ मीटर

**व्यास:** १३-२० सें.मी.

**पेरामधील अंतर:** ३०-३८ सें.मी.

**पेराची जाडी:** जाड पेर

**फुलोरा चक्र:** ४०-४५ वर्षं

**पुनरुत्पादन:** शाकीय पद्धतीने; उती संवर्धनाने

**लागवडी योग्य अंतर:** ५ बाय ७ मीटर

**आढळस्थान:** मणिपुरच्या जीरींग भागात, अंदमान

**उपयोग:** हिरव्या रंगाचा हा बांबू मोठा असल्या कारणाने विशेषतः बांधकामात वापरला जातो. बास्केटरी आणि हस्तकला मध्ये सुद्धा याचा वापर होतो. तसेच या बांबू चे कंद खाण्यायोग्य समजले जातात.

8. **शास्त्रीय नाव: Dendrocalamus giganteus**

**स्थानिक नाव:** जायंट बांबू

**ऊंची:** ३०-३४ मीटर

**व्यास:** २०-३० सें.मी.

**पेरामधील अंतर:** ३५-४० सें.मी.

**पेराची जाडी:** २.२-५ सें.मी.

**फुलोरा चक्र:** ४०-८० वर्षं

**पुनरुत्पादन:** शाकीय पद्धतीने; उती संवर्धनाने

**लागवडी योग्य अंतर:** ६ बाय ७ मीटर

**आढळस्थान:** म्यानमार, असाम, मणीपुर, नागालँड

**उपयोग:** आपल्या नावाप्रमाणेच भव्य दिव्य असलेला हा बांबू दुरून च ओळखायला येतो. ऊंची आणि गोलाई चा तुलनेत हा बांबू जगातील सर्वात मोठा बांबू मानला जातो. वरील बांबू मध्ये पेराचा व्यास जवळपास एकसमान असल्यामुळे याला पोल बनविण्याच्या कामात आणि मोठ्या कामांसाठी जसे की जहाजकाम, खांबकाम, बांधकाम इत्यादि मध्ये विशेषतः केला जातो. या बांबू चा कोंबा पासून स्वादिष्ट व्यंजन सुद्धा बनविण्यात येतात.

9. **शास्त्रीय नाव: Bambusa bambos**

**स्थानिक नाव:** कटांग

**ऊंची:** २०-२५ मीटर

**व्यास:** १२-१५ सें.मी.

**पेरामधील अंतर:** ३०-४५ सें.मी.

**पेराची जाडी:** १-२ सें.मी.

**फुलोरा चक्र:** ३०-३४-३०-४५-४४-४९ वर्षं

**पुनरुत्पादन:** बियापासून; शाकीय पद्धतीने; उती संवर्धनाने

**लागवडी योग्य अंतर:** ५ बाय ५.५ मीटर

**आढळस्थान:** केरळ, पूर्व भारत

**उपयोग:** या बांबू च्या फांद्यांना काटे असल्यामुळे याला कटांग नावाने संबोधतात. या बांबू चा उपयोग लगदा, बाण, फर्निचर, बासरी, इमारती माल, फळ्या, कुंपण इत्यादी साठी होतो. तसेच या बांबू चे कोंब व बिया खाण्यासाठी योग्य आहेत. तसेच या बांबू च्या पानांचा उपयोग चारा आणि औषधी म्हणून देखील केला जातो.

10. **शास्त्रीय नाव: Dendrocalamus stocksii**

**स्थानिक नाव:** माणगा

**ऊंची:** १०-२० मीटर

**व्यास:** ५-८ सें.मी.

**पेरामधील अंतर:** १५-२० सें.मी.

**पेराची जाडी:** भरीव

**फुलोरा चक्र:** ४०-४५ वर्षं

**पुनरुत्पादन:** शाकीय पुनरुत्पादन

**लागवडी योग्य अंतर:** ५ बाय ५ मीटर

**आढळस्थान:** महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ

**उपयोग:** मध्यम आकाराचा असलेला हा बांबू टोपल्या बनविण्यापासून ते घरबांधणी कामात उपयोगी पडतो. इतर क्षेत्रात सुद्धा जसे की हस्तकला, अगरबत्ती, फर्निचर, बांधकाम, बास्केटरी मध्ये या बांबू चा प्रयोग केल्या जातो.

11. **शास्त्रीय नाव:** Dendrocalamus longispethus

**स्थानिक नाव:** रूपई

**ऊंची:** १०-१८ मीटर

**व्यास:** ६-१० सें.मी.

**पेरामधील अंतर:** ४०-६० सें.मी.

**पेराची जाडी:** ०.७-१.२ सें.मी.

**फुलोरा चक्र:** ३०-३५ वर्षं

**पुनरुत्पादन:** बियापसून; शाकीय पद्धतीने

**लागवडी योग्य अंतर:** ५ बाय ५ मीटर

**आढळस्थान:** मिजोरम, त्रिपुरा, बिहार, ओरीसा

**उपयोग:** या बांबू चा उपयोग लगदा, landscaping, टूथपिक्स, टोपल्या इत्यादि कामांसाठी केला जातो.

12. **शास्त्रीय नाव:** Dendrocalamus hamiltonii

**स्थानिक नाव:** ड्राओपिंग बांबू

**ऊंची:** १२-२५ मीटर

**व्यास:** १०-१९ सें.मी.

**पेरामधील अंतर:** ३०-५० सें.मी.

**पेराची जाडी:** १.२-१.३ सें.मी.

**फुलोरा चक्र:** ३५-४५ वर्षं

**पुनरुत्पादन:** बियापासुन; शाकीय पद्धतीने; उती संवर्धनाने

**लागवडी योग्य अंतर:** ५ बाय ६ मीटर

**आढळस्थान:** उत्तर पूर्व भारत, सिक्किम, अरुणाचल प्रदेश, असाम, मिजोरम, नागालँड

**उपयोग:** या बांबू चा उपयोग बांधकाम क्षेत्रात अधिकतर केला जातो. तसेच या बांबू चे कोंब खाण्यायोग्य मानल्या जातात.

13. **शास्त्रीय नाव:** Dendrocalamus asper

**स्थानिक नाव:** गोड बांबू

**ऊंची:** २०-२५ मीटर

**व्यास:** ८-१२ सें.मी.

**पेरामधील अंतर:** ४०-५० सें.मी.

**पेराची जाडी:** १-२ सें.मी.

**फुलोरा चक्र:** १०० वर्षं

**पुनरुत्पादन:** शाकीय पद्धतीने; बियापसून; उती संवर्धनाने

**लागवडी योग्य अंतर:** ५ बाय ७ मीटर

**आढळस्थान:** चीन

**उपयोग:** वरील बांबू चा उपयोग खांब उभारण्यासाठी तसेच लगदा बनविण्याकरिता पेपर कारखान्यांमद्धे केला होतो. याचे कोंब खाण्यासाठी योग्य मानले जातात.

---